दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप |
उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

बीड महाराष्ट्र | रविवार | 17 ऑगस्ट 2025 |
| अंक क्र. 100 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

कुठेही काही अनुचित प्रकार, घडल्यास बातमीसाठी आणि व्हिडिओ पाठविण्यासाठी आम्हाला संपर्क करा : आपले नाव गुपित ठेवले जाईल

मो 8421577797

# स्वातंत्र्य दिनानिमित्त जालन्यात पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण

## जालना जिल्हा विकासात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी कटीबध्द

> जालना जिल्ह्यातील समग्र शिक्षा योजने अंतर्गत वर्ष 2025-26 मध्ये 15 जुन रोजी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील एकुण 1 लाख 38 हजार 21 विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीतील 57 विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला आहे. त्यापैकी 13 विद्यार्थ्यांनी सुवर्ण तर 2 विद्यार्थ्यांनी रौप्य आणि 2 विद्यार्थ्यांनी कास्य राष्ट्रीयस्तरावरील पदके मिळवली आहेत.

जालना

जालना शहर औद्योगिक शहर म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. यापुढेही जालना जिल्ह्यात शासनाकडून विविध विकासात्मक कामे करुन आपल्याला विकास साधावयाचा आहे. तरी पालकमंत्री या नात्याने जालना जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द राहील, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केले.







जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती. तर यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण यांची उपस्थिती होती.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जिल्ह्यात नूकत्याच पार पडलेल्या महसूल सप्ताहाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, वृक्ष लागवड, विविध दाखल्याचे वितरण, डिबीटीद्वारे लाभ, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे यासारखी अनेक उल्लेखनीय कामे करण्यात आली आहे. पाणंद रस्ते, शेतरस्ते मोकळे करणे अभियानातंर्गत जालना जिल्ह्यात एकुण 180 रस्ते ज्यांची लांबी 288.25 कि.मी. अतिक्रमणमुक्त करण्यात आले असून नोंद अधिकार अभिलेखात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सन 2025-26 पासून तालूका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य स्तरांवर प्रोत्साहन देण्यासाठी 'मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान' राबविण्यात येणार आहे.

जालना जिल्हा परिषदेने पर्यावरणपुरक आणि सामाजिक हितासाठी तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे यासाठी जिल्हा परिषद परिसर स्वच्छ व सुंदर राहावा याकरीता 'झिरो प्लास्टिक मोहिम' राबवून प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे. याचप्रमाणे संपूर्ण जिल्ह्यात देखील ही मोहिम राबविण्याचे प्रशासनाचा मानस आहे. तरी या मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना जिल्ह्यातील समग्र शिक्षा योजने अंतर्गत वर्ष 2025-26 मध्ये 15 जुन रोजी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील एकुण 1 लाख 38 हजार 21 विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वितरण करण्यात आले आहे. जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीतील 57 विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला आहे. त्यापैकी 13 विद्यार्थ्यांनी सुवर्ण तर 2 विद्यार्थ्यांनी रौप्य आणि 2 विद्यार्थ्यांनी कास्य राष्ट्रीयस्तरावरील पदके मिळवली आहेत. जिल्हा क्रिडा संकूलामध्ये अद्ययावत क्रिडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यामध्ये अंतर्गत टेनिस कोर्ट, सिंथेटीक बास्केटबॉल, आर्टिफिशियल क्रिकेट टर्फ, सिंथेटीक स्केटींग रिंग, व्हॉलीबॉल मैदान, कबड्डी मैदान, खोखो मैदान, जिम हॉल, , संरक्षक भिंत तसेच अंतर्गत रस्ते व ड्रेनेज लाईन आदि कामे जिल्हा क्रीडा संकुल समितीकडून विकसित करण्यात आली आहेत. तर 400 मिटर सिंथेटीक ट्रॅक व नॅचरल फुटबॉल मैदानाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये स्पर्धा व सराव करण्याची वृत्ती निर्माण व्हावी या उद्देशाने जालना जिल्हाधिकारी यांच्या 'महादीप' या महत्वाकांक्षी योजनेतून श्रीहरी कोटा येथील इस्त्रो अंतराळ विज्ञान केंद्रातील संग्रहालयात जिल्ह्यातील 50 विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक परिक्षा घेवून विमानाद्वारे सहल नेण्यात आली.

## नवीन गुंतवणुकीला चालना

- जिल्ह्यात नवीन गुंतवणूकीला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी एप्रिल 2025 मध्ये जिल्हा गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत 4 उद्योगासोबत 2 हजार 79 कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार झाले असून, यामधून सुमारे 3 हजार युवकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. पशुसंवर्धन विभागाने पूर्ण क्षमतेने काम करावे यासाठी महत्वाचे निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्यात 357 ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. तसेच पशुसंवर्धन व्यवसायाला आता कृषी समकक्षचा दर्जा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण होणे आणि शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशाने 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेमध्ये जालना जिल्ह्यातील सर्व विभागांनी केलेल्या अतिशय प्रभावी कामगिरीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले.
- शंभर दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा आणि धोरणात्मक बाबींवर आधारित कार्यक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी 6 मे ते 2 ऑक्टोंबर या कालावधीत दीडशे दिवसांचा कृती आराखडा जाहिर केला आहे. या उपक्रमांतर्गत 'विकसित भारत 2047' च्या धर्तीवर 'विकसित महाराष्ट्र 2047' चे व्हिजन डॉक्युमेट तयार करण्यात येणार आहे. विकसित महाराष्ट्र-2047 करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाची प्रचलित कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, पारदर्शी आणि सहजसुलभ होण्यासाठी कोणत्या प्रकारच्या धोरणात्मक बाबी असाव्यात, याकरीता जिल्ह्यातील नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आपले अभिप्राय सादर करावेत. असे आवाहन करते. स्व.गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेअंतर्गत अपघाताने मृत्यू झालेल्या व अपंगत्व आलेल्या एकुण 210 शेतकऱ्यांच्या वारसदारास 4.25 कोटी रुपये रक्कम सानुग्रह अनुदान मंजूर केले आहे. नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प टप्पा -2 अंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये 177 गावांची निवड करण्यात आली असून ग्राम कृषि विकास समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत 531 लाभार्थ्यांना 26.64 कोटी रुपये कर्जाचे वितरण तर 11.30 कोटी रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीचे वातावरण निर्माण व्हावे, तिरंगामय वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी 13 ते 15 ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. असेही त्यांनी यावेळी सांगितले. भाषणानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते गौरवास्पद कामगिरी केलेल्या अधिकारी, कर्मचारी, तसेच विर पत्नी, विर पिता यांच्यासह 100 दिवसांच्या कार्यक्रमात अव्वल आलेल्या कार्यालयाचाही यथोचित सन्मान करण्यात आला. उपस्थित लोकप्रतिनिधी, मान्यवर व नागरिकांची पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी भेट घेतली. प्रारंभी ध्वजारोहण झाल्यानंतर पोलीस दलाच्यावतीने राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले व राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली.

# बीड पोलीस दलाची नशामुक्ती जनजागृती रॅली उत्साहात



बीड

अंमली पदार्थ विरोधी सप्ताहाच्या अनुषंगाने "नशामुक्त बीड अभियान" अंतर्गत बीड पोलीस दलाच्या वतीने जनजागृतीपर मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

आज दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता, पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून ही रॅली काढण्यात आली.

या रॅलीमध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासह युवकांनीही सहभाग नोंदवत समाजाला व्यसनमुक्तीचा संदेश दिला.रॅलीदरम्यान "नशा सोडा – आरोग्य जोडा", "व्यसनमुक्ती हीच खरी देशभक्ती" अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

बीड पोलीसांचे हे अभियान नागरिकांना नशामुक्त जीवनाचा संकल्प करण्यास निश्चितच प्रेरणा देणारे ठरले.





# जालन्यात पोलिस प्रशिक्षण कक्ष, अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणा व वाहतूक सिग्नलचे पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते थाटात लोकार्पण

**जालना**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत, जालना जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्वाकांक्षी सीसीटिव्ही यंत्रणेचे आज राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या सीसीटिव्ही यंत्रणा व वाहतूक सिग्नल यंत्रणेमुळे जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेला नवी दिशा व पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून 5 कोटी खर्चून मंजूर करण्यात आलेल्या अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणा, पोलीस प्रशिक्षण कक्ष व सीएसआर फंडातून ग्रेडर टी पॉईंट येथे वाहतूक सिग्नल यंत्रणेचे लोकार्पण ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाची मोलाची साथ मिळणार आहे. नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण सभागृहामुळे पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन, वाहतूक सिग्नलमुळे शहरातील वाहतुकीस अधिक शिस्तबद्ध आणि सुरळीत चालना मिळणार आहे.

कार्यक्रमास भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, आ. अर्जुन खोतकर, आ. हिकमत उढाण, आ. राजेश राठोड, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषद सीईओ मिन्नू पी. एम., मनपा आयुक्त खांडेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कायदा - सुव्यवस्थेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा अतिशय महत्वाची




## पोलिस दलाच्या कार्यक्षमतेतही वाढ होईल, शहरातील उद्योजकांसोबत केली चर्चा




### जनतेची सुरक्षा महत्वाची

- या उपक्रमामुळे जालना शहरातील कायदा-सुव्यवस्थेला नवी दिशा मिळणार असुन, पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली.
- अत्याधुनिक सीसीटिव्ही यंत्रणेमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाची मोलाची साथ मिळणार आहे.तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण सभागृहामुळे पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.

### उद्योजकांसोबत चर्चा

- पोलिसांच्या कार्यक्रमांवर ना. पंकजाताई मुंडे यांनी शहरातील प्रमुख स्टील इंडस्ट्रीजच्या उद्योजकांसोबत चर्चा केली.
- 'जालना फस्ट' अंतर्गत शहरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व अन्य उपक्रम राबविण्यात येणार आहेत, याचं सादरीकरण बैठकीत करण्यात आलं. या उपक्रमाचे कौतुक करून पंकजाताई मुंडे यांनी शहराला क्रमांक एक वर आणण्यासाठी माझे नेहमीच सहकार्य राहील असं सांगितलं.

# जालन्यात रंगला गोर बंजारा तिज महोत्सव; ना.पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

**जालना**

सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या गोर बंजारा समाजाच्या तिज महोत्सव शहरातील सोरटी नगर येथे आजपासून सुरू झाला. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी सकाळी विशेष हजेरी लावल्याने या महोत्सवाला अधिक रंगत आली. पारंपरिक वेषभूषेत सहभागी झालेल्या बंजारा महिलांसोबत पंकजाताई मुंडे याठिकाणी रमल्या, त्यामुळे त्यांची उपस्थिती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

आमदार राजेश राठोड यांच्या विशेष आमंत्रणावरून जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी सोरटी नगर, अंबड चौफुली येथे या उत्सवाला भेट दिली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.पारंपरिक वेशभूषा, पारंपरिक खाद्यपदार्थ आणि रंगीबेरंगी झांजपथकांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. बंजारा महिलांचे पारंपरिक लेंगा-चोळी परिधान करत साजरे केलेले तिज नृत्य यामध्ये काहीकाळ पंकजाताई मुंडे रममाण झाल्या. पंकजाताईंनी महोत्सवात सहभाग घेतल्यावर उपस्थित बंजारा बांधवांशी आत्मियतेने संवाद साधला. यामुळे बंजारा समाज बांधवांचा उत्साह द्विगुणित झाला होता.

त्यांनी बंजारा समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे आणि एकतेचे कौतुक केले. गोर बंजारा समाजाच्या संस्कृतीतील ही तिज परंपरा ही आपली अस्मिता आहे. समाजाच्या प्रेमाने आणि उत्साहाने मन आनंदून गेले अशी भावना यावेळी पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली.यावेळी पारंपरिक पामडी देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.



**महसूल पंधरवाडा** | **प्रशासनातील दीपस्तंभ**

# अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा तत्पर सनदी अधिकारी



सनदी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा यांच्या दालनात शिरण्यापूर्वी मी अभ्यागात कक्षामध्ये नजर टाकली. स्वागत कक्षामध्ये पुस्तके ठेवली होती .त्याचप्रमाणे त्या दिवसाचे वर्तमानपत्र ठेवले होते. याशिवाय फुलांचा एक शो पीस गुच्छ पण ठेवला होता. पुस्तके पाहून मला चांगलेच वाटले. मी पुस्तके चाळली. ती वाचनीय होती. तेवढ्यात बेल वाजली. मॅडमनी मला आत बोलावले होते. मी माझ्या बरोबरचे सहकारी श्री प्रशांत भाग्यवंत सोनाली बुंदे श्री अनिल मोहोड यांना घेऊन आतमध्ये गेलो. मॅडमनी आम्हाला बसायला सांगितले.

आणि खुर्च्यावर बसताच पाणी आले .मी विभागीय आयुक्त मॅडमनी दिलेला कागद सौम्या मॅडमकडे सोपविला. मॅडम म्हणाल्या मला आत्ताच कमिश्नर मॅडमचा फोन आलेला आहे. त्यांनी मला आपल्याबद्दल सांगितले आहे. आपण हा उपक्रम आपल्या परिसरामध्ये राबवू.

त्यांनी लगेच फोन करून शिक्षणाधिकारी माध्यमिक श्री रवींद्र काटोलकर व शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती गुरव यांना बोलावून घेतले. आमचा मिशन आय.ए.एस.चा प्रकल्प पूर्ण समजावून घेतला. संबंधित उपक्रम आपल्या विभागात राबवायच्या आहे असे त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना सांगितले. आम्ही सौम्या मॅडमचा निरोप घेतला.

काही कारणास्तव मी नागपूरला गेलो होतो. सौम्या शर्मा तेव्हा नागपूरला नागपूर जिल्हा परिषदेला मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. आम्ही नेहमीप्रमाणे कर्तव्यदक्ष विभागीय आयुक्त श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी यांना भेटावयास नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात गेलो. मिशन आयएएस हा उपक्रम आम्हाला नागपूर वर्धा चंद्रपूर गडचिरोली भंडारा व गोंदिया या 6 जिल्ह्यात राबवायचा होता. त्यासाठी मी रितसर पत्र विभागीय आयुक्त नागपूर यांच्या नावाने टंकलिखित करून आणले होते. विभागीय आयुक्त श्रीमती विजयालक्ष्मी बिदरीमॅडमची अगोदरच वेळ घेतल्यामुळे त्यांची लगेच भेट झाली. त्यांना आमचा हा प्रकल्प आवडला. त्या म्हणाल्या आपल्या नागपूर जिल्ह्यापासून सुरुवात करू या. तुम्ही असं करा आमच्या कार्यालयाच्या बाजूलाच नागपूर जिल्हा परिषद आहे. तिथे सौम्या शर्मा आता मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू झालेल्या आहेत. असे म्हणून त्यांनी फोन उचलला. आणि फोनवर लगेच सौम्या शर्मा यांना हा प्रकल्प नागपूर विभागात राबविण्याचा सूचना केल्या. बिदरीमॅडम म्हणाल्या तुम्ही असं करा हे पत्र असेच असे सौम्या शर्मा मॅडमकडे घेऊन जा. मी त्यांना तशा सूचना केलेल्या आहेत. आम्ही बिदरीमॅडम कडील चहापाणी आटोपल्यावर नागपूर जिल्हा परिषद परिसरात गेलो .नागपूरची जिल्हा परिषद ही विभागीय आयुक्त कार्यालयाला लागूनच आहे. मी माझे विजिटिंग कार्ड आत मध्ये पाठवले. तोपर्यंत आम्ही स्वागत कक्षाचे निरीक्षण केले.

सौम्या शर्मा मॅडमनी मिशन आयएएस नागपूर जिल्ह्यात राबविण्यासाठी तत्पर निर्णय घेतला होता.

म्हणतात ना,

*जितने वाले कोई अलग काम नही करते*
*वहा हर काम अलग ढंग से करते है*

गेल्या दोन वर्षात आम्ही अमरावती जिल्ह्याबरोबर नागपूर जिल्हा त्याचबरोबर नागपूर विभागातील अनेक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्पर्धा परीक्षा कार्यशाळांसाठी पिंजून काढला .आमच्या या उपक्रमात माझी लेडी गव्हर्नर श्रीमती कमलताई गवई ह्या देखील सहभागी झाल्या होत्या .नागपूर जिल्हा म्हणजे मोठा जिल्हा .पण श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे मिशन आय ए एस हा प्रकल्प नागपूर जिल्ह्यात व विभागात सुरू झाला.

नागपूर विभागात कार्यक्रम म्हणजे राहणे जेवणे आले. वाहनाचा खर्च आला. आमच्या नियमात तर आम्ही मानधन प्रवास खर्च घेत नाही. पण या कामात आमचे नागपूरचे मित्र मदतीला आले. नागपूरचे अपर आयुक्त श्री रवींद्र ठाकरे महाज्योतिचे महासंचालक श्री राजेश खवले उपायुक्त श्री कमल किशोर फुटाणे कर्नल राजू पाटील महाराष्ट्र बँकेचे श्री मोहन टोंगे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री अरविंद गिरी पोलीस निरीक्षक श्री संजय पांडे प्रा. रमेश पिसे अनिल आसेगावकर अनिल मोहोड प्रशांत भाग्यवंत सोनाली बुंदे अभिजीत मानकर डॉ. हर्ष यादव कुलगुरू प्रकाश घवघवे कुलगुरू सुभाष चौधरी मा आर टी ओ अधिकारी श्री शरद जिचकार आर टी ओ अधिकारी श्री रवींद्र भुयार हे मदतीला आले. आणि एक चांगला प्रकल्प अमरावती बरोबर नागपूर विभागातही सुरू झाला. या चांगल्या प्रकल्पाची सुरुवात झाली ती श्रीमती सौम्या शर्मा यांच्या पुढाकाराने. आज सौम्या शर्मा अमरावतीला महानगरपालिकेमध्ये आयुक्त म्हणून रुजू झाल्या आहेत. रुजू झाल्याबरोबर मावळते आयुक्त श्री सचिन कलंत्रे यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना रितसर कार्यभार दिला. सौम्या शर्मा व त्यांचे यजमान अर्चित चांडक हे दोघेही चांगल्या गोष्टीसाठी समाज माध्यमावर चर्चेत आहे. श्री अर्चित चांडक हे अकोला येथे जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असून परवाला अमरावती पोलीस आयुक्तालयात ते नवीन पोलीस आयुक्त श्री अरविंद चावरिया यांना भेटून गेले. तेव्हा अमरावतीच्या पोलीस आयुक्तालयात भेटीचा योग आला होता .

अमरावती शहराला एक चांगला कर्तव्यदक्ष तत्पर महानगरपालिका आयुक्त लाभल्याबद्दल अमरावतीकर भाग्यवान आहेत. आतापर्यंत सौम्या शर्मा यांनी आपल्या अल्प कालावधीमध्ये आपल्या कामाची झलक नागपूर विभागामध्ये रुजविली आहे. अमरावती शहराचा कायापालट करण्यामध्ये त्यांची निश्चितच आयुक्त म्हणून महत्त्वाची भूमिका राहील. आपण देखील अमरावतीकर नागरिक म्हणून त्यांच्या चांगल्या उपक्रमामध्ये सहभागी होऊन त्यांना सहकार्य केले पाहिजे.

**प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे**
*संचालक मिशन आयएएस अमरावती*


# श्रीमती निधि पाण्डेय : एक कर्तव्यदक्ष आय ए एस अधिकारी

गेल्या पन्नास वर्षात वेगवेगळ्या चळवळीत कार्यरत असल्यामुळे व गेल्या 25 वर्षापासून आयएएस मिशनमध्ये काम करीत असल्यामुळे अनेक आयएएस आयपीएस आय आर एस व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी सातत्याने होत राहतात .काही अधिकारी असे असतात की जे कायमचे स्मरणात राहतात .असाच योगायोग श्रीमती निधी पाण्डेय मॅडम यांच्या बाबतीत म्हणावा लागेल . त्या सध्या मुंबईला MSSIDC म्हणजे महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळामध्ये व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत.

यापूर्वी अमरावतीला विभागीय आयुक्त म्हणून असताना त्यांच्या नेहमी भेटी व्हायच्या.

मी सतत दौऱ्यात असल्यामुळे विभागीय आयुक्त म्हणून श्रीमती पांडेय मॅडम रुजू झाल्यानंतर त्यांना बऱ्याच दिवसानंतर मी भेटलो. निमित्त होते अमरावतीला होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे .ही कार्यशाळा ६ जून रोजी छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकानिमित्त आम्ही आयोजित केली होती. मी जेव्हा विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचलो .कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी माझे व्हिजिटिंग कार्ड आतमध्ये पाठविले आणि एकाच मिनिटांमध्ये श्रीमती निधी पाण्डेय मॅडमनी मला आत बोलाविले. मी गुड इवीनिंग म्हणताच मॅडमनी प्रतिसाद दिला आणि मला बसायला सांगितले .मी माझा स्वतःचा परिचय करून दिला .कारण मॅडमची माझी ही पहिलीच भेट होती .मिशन आयएएसबद्दल अगदी थोडक्यात त्यांना माहिती सांगितली .तसेच मी स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिराचे रितसर निमंत्रण त्यांना द्यावयाला एक शिष्टाचार म्हणून उभा राहिलो आणि आणि मला धक्का बसला. श्रीमती निधी पाण्डेय मॅडम पत्र घेण्यासाठी चक्क उभ्या झाल्या. त्यांनी ते पत्र स्वीकारले. वाचले आणि मला म्हणाल्या मी नक्की येते. मी कोण्या दिवशी येणार आहे हे तुम्हाला फोन करून कळविते .अतिशय हास्यवादाने ते त्यांनी पत्र स्वीकारले आणि हास्य वदनाने मी त्यांचा लगेच निरोप घ्यायला लागलो. मी जसा खुर्चीवरून उठलो आणि त्यांना निरोपाचा नमस्कार करायला लागलो. तेव्हा मॅडम देखील खुर्चीवरून उठल्या आणि मला सोडायला त्यांचे दालन पार करून त्यांच्या पीए च्या दालनात आल्या.अकस्मात मॅडम आलेल्या पाहून सर्व स्टाफ उभा राहिला. त्यांनी शिपायाला मला गाडीपर्यंत सोडण्यास सांगितले.

मी कक्षाच्या बाहेर आलो .आमची ही भेट उणे पुरे पाच मिनिटांची असेल .पण या पाच मिनिटांमध्ये आदर्श विभागीय आयुक्त कसा असावा याचा एक आदर्श नमुना मॅडमने आमच्यासमोर ठेवून दिला .आम्ही लेखक. त्यामुळे प्रत्येकाची नोंद आमच्यात कायमची असते. मॅडमनी पाच मिनिटांमध्ये जी वागणूक दिली ती दीर्घकाळ टिकून राहण्यासारखी आहे .खरं म्हणजे विभागीय आयुक्त हे आपल्या विभागातील सर्वोच्च पद असलेली जागा .त्या जागेवर एक अतिशय सुस्वभावी हसतमुख आणि पॉझिटिव्ह विचारसरणी असलेली व्यक्ती जेव्हा विराजमान होते तेव्हा पूर्ण प्रशासनाला नकळत गतीमानता येते .माझे निमंत्रण स्वीकारायला उभे राहणे. हसतमुखाने स्वागत करणे .मी नक्की येते असे म्हणणे. मी स्वतःहून फोन करते आणि मी जेव्हा निरोपाला निघालो तेव्हा आपल्या खुर्चीवरून उठून दारापर्यंत येऊन निरोप देणे या सगळ्याच गोष्टी नोंदणीय आहेत.



६ जूनला शिवराज्याभिषेकानिमित्त आमचे स्पर्धा परीक्षेचे राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिर अमरावतीला सुरू झाले. संपूर्ण महाराष्ट्रातून मुलं मुली आलेल्या .मला शिबिराचा परिसर सोडणे शक्यच नव्हते . शिबिराला येण्याची एक आठवण म्हणून मी माझे सहकारी श्री मनोहर वासनकर यांना श्रीमती निधी पांण्डेय मॅडम यांना भेटावयास पाठविले. मॅडमनी शिबिराला येते म्हणून परत फोन करायला सांगितले .एवढेच नाही तर मॅडमनी चक्क आपला मोबाईल नंबर श्री वासनकरांना दिला आणि सांगितले की सरांना मला फोन करायला सांगा .मी येते म्हणूनही सांगा .एक विभागीय आयुक्त आपला मोबाईल नंबर देतो हे खरोखरच नोंद करण्यासारखे आहे .

श्री. वासनकर परत आले आणि मला त्यांनी मॅडमचा मोबाईल नंबर दिला .मी दुसऱ्या दिवशी मॅडमला फोन लावला. आमचे शिबिर मार्डी रोडवरील ग्रीन सर्कलमध्ये सुरू होते. तिथे रेंजचा प्रॉब्लेम होता. मॅडमचा फोन लागला नाही. पण एकच मिनिटांमध्ये माझा फोन परत खणखणला. मी पाहिले तो निधी पाण्डेय मॅडमचाच फोन होता. त्यांनी स्वतःहून मला फोन केला होता. त्या म्हणाल्या महामहीम राज्यपाल साहेबांचा दौरा ठरला आहे. मला तातडीने धारणीला जावयाचे आहे .धारणीवरून लोणार विकास आराखडा व शेगाव विकास आराखडा यांच्या बैठकीला उपस्थित राहायचे आहे. पण मी किती तारखेला येणार हे तुम्हाला शनिवारी कळविते.

माझ्यासाठी हा दुसरा धक्का होता .एका विभागीय आयुक्तांनी स्वतःहून फोन करणे आणि आपण जे काम करीत आहात त्या कामाला त्या कामात मी उपस्थित राहून येणाऱ्या मुलांना मार्गदर्शन करणार हे त्यांनी नकळत सुचित केले.

सन्माननीय पाण्डेय मॅडमची ही वागणूक चळवळीमध्ये काम करणाऱ्या आमच्यासारख्या लोकांना खूप कामाची असते .एक अतिशय व्यस्त असणारा अधिकारी पाच विभागाची जबाबदारी असणारा अधिकारी इतक्या प्रेमळ भावनेने इतक्या कर्तव्यदक्षतेने आमची दखल घेतो हे खरोखरच शब्दातीत आहे .शिबीर संपल्याबरोबर त्याच दिवशी मी मा. श्री ज्ञानेश्वर मुळे आय एफ एस मा. परराष्ट्र सचिव यांनी कोल्हापूरला अरेंज केलेल्या एका आठवड्याच्या शिबिरासाठी रवाना झालो. मी कोल्हापूरला पोहोचलो आणि माझे आय ए एस ची तयारी करणारे श्री प्रशांत भाग्यवंत यांचा मला फोन आला. त्यांना श्रीमती निधी पाण्डेय मॅडमशी भेटायचं होतं. एक छोटेसे काम होते .मी मॅडमच्या कार्यालयात लगेच फोन लावला. तिथले कार्यालयीन स्वीय सहाय्यक यांनी मॅडम कार्यालयातच आहेत. त्यांनी तुमच्या विद्यार्थ्याला दहा मिनिटात भेटावयास बोलाविले आहे .असा निरोप दिला.

मी प्रशांतला दहा मिनिटात विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचण्यास सांगितले .प्रशांत भाग्यवंत आणि अंकित राणे हे दोन्ही IASची स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी माझ्याकडेच राहतात आणि माझे घर ते विभागीय आयुक्त कार्यालय याच्यामध्ये फार तर चार मिनिटाचे अंतर आहे. पण मला असे वाटते प्रशांतला पोहोचायला वेळ झाला .प्रशांत जेव्हा कार्यालयात पोहोचला तेव्हा मॅडम कार्यालयातून निघून गेल्या होत्या. पण त्यांनी निरोप ठेवला होता .प्रशांत कार्यालयात पोहचला. तिथल्या स्वीय सहायकांनी प्रशांतचा नंबर नोंदवून घेतला. आणि प्रशांतला धक्काच बसला .काही वेळातच चक्क विभागीय आयुक्तांनी प्रशांतला फोन केला. त्याचे काम समजून घेतले आणि त्या कामाच्या संदर्भातील सर्व कागदपत्र त्यांच्या व्हाट्सअपवर पाठविण्यास सांगितले. ही तर फारच मोठी गोष्ट झाली. एक विभागीय आयुक्त काठोळे सरांच्या विद्यार्थ्याला स्वतःहून फोन करतो. त्याचे काम समजून घेतो आणि संबंधित कागदपत्रे व्हाट्सअपवर पाठवायला सांगतो. प्रशांतने जेव्हा हा सर्व वृत्तांत मला कोल्हापूरला कळविला तेव्हा मला देखील खूप खूप बरे वाटले . प्रशांतने सांगितलेली घटना सुखद आनंद देऊन गेली .आणि मनाला वारंवार वाटत गेले की निधी पाण्डेय मॅडमनी मला वासनकर सरांना आणि माझे विद्यार्थी श्री प्रशांत भाग्यवंतांना जी वागणूक दिली ती निश्चितच नोंदणीय आहे. अनुकरणीय आहे. प्रशासनामध्ये असे अधिकारी असले म्हणजे अधिकाऱ्यांना देखील काम करण्यास उत्साह येतो .तसेच आमच्यासारखे सामाजिक जीवनामध्ये वावरणारे जे कार्यकर्ते असतात त्या कार्यकर्त्यांना देखील कळत नकळत बळ मिळत जाते .

निधी पाण्डेय मॅडमला अनेक वेळा भेटलो .परंतु जसे नेपोलियनच्या बाबतीत म्हणतात ते भेटले त्यांनी पाहिले आणि त्यांनी जिंकले. या ओळी मॅंडमला तंतोतंत लागू होतात. विभागीय आयुक्त म्हणून श्रीमती निधि पाण्डेय अमरावतीला असताना जो विकासात्मक व सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारला तो आजही अमरावतीकरांच्या लक्षात आहे. त्या दृष्टिकोनाला त्यांच्या समाजाभिमुख वागण्याला हृदयापासून मानाचा मुजरा करावासा वाटतो. एक वेळ मी त्यांना भेटावयास गेलो. तेवढ्यात अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांना भेटावयास आल्या. नागपूर कोर्टातील काम आटोपून अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी विभागीय आयुक्तांना भेटावयास आल्या होत्या.. बोलता बोलता माझ्या तोंडून मी गाडी आणलेली नाही हे निघून गेले. निधी पांडे मॅडम मला म्हणाल्या मी सोडते तुम्हाला घरी. एक विभागीय आयुक्त इतका विनम्र असू शकतो याचे निधी पांडे म्हणजे मूर्तीमंत उदाहरण उदाहरण वाटले. मॅडमचे कार्यालयीन काम आटोपल्यानंतर आम्ही निघालो .मी गाडीमध्ये बसायला लागलो. तसा मॅडमच्या बरोबर असलेला बॉडीगार्ड म्हणाला तुम्ही त्या साईडने बसा. या साईडने मॅडम बसतात. मॅडमच्या कानावर ते शब्द पडले. त्यांनी पोलिसाला थांबविले. आणि मला गाडीत बसण्यास सांगितले..

मॅडम सध्या महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळामध्ये मुंबईला व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत. अमरावतीला विभागीय आयुक्त असताना त्यांनी केलेले कार्य अजूनही अमरावती करांच्या लक्षात आहे. अशा या तत्पर तेजस्वी व तपस्वी आयएएस अधिकारी असणाऱ्या डॉक्टर निधी पांडे यांना महसूल मासानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)





# परळी तहसील येथे 79 वा स्वातंत्र्यदिन दिमाखात साजरा

## ध्वजारोहणानंतर संविधान गीत, आणि शालेय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक संपन्न

**परळी : प्रतिनिधी**

भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन परळी तहसील कार्यालयात देशभक्तीच्या जल्लोषात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर आणि तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, राजकीय-सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संविधान गीत, लेझीम, देशभक्तीपर गीत आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

स्वातंत्र्याचा अभिमान, शौर्य आणि त्यागाचा संदेश देणारा हा सोहळा परळीत अविस्मरणीय ठरला.




# परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नं 2 येथे स्वातंत्र्यदिन साजरा

**परळी प्रतिनिधी**

परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नंबर दोन येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी भीम नगर जगतकर गल्ली येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नंबर दोन येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला असून यानिमित्त सकाळी सात पन्नास वाजता शाळेचे मुख्याध्यापक भद्रे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर मानपत्र चे संपादक बालासाहेब जगतकर यांच्या हस्ते करण्यात आली असून यावेळी विविध देखावे ही यावेळी साजरे करण्यात आली या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर साप्ताहिक मानपत्र चे संपादक बालासाहेब जगतकर शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सुरज आण्णा जगतकर शालेय शिक्षण समितीचे सदस्य अशोक जोगदंड निलेश जगतकर सविताताई बनसोडे जगतकर ताई यांचा शाळेच्या वतीने हृदय सत्कार करण्यात आला असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक वृंद यांनी प्रयत्न केले असून यावेळी महिला व पालक ही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




# पुणे शहरातील आ. सुरेश धस यांच्या आभार दौऱ्यास उपस्थित रहा - बंडु साहेब तोडकर ,बंटी सगळे

**पुणे प्रतिनिधी**

आष्टी,पाटोदा,शिरूर मतदार संघातील नागरीक पुणे शहरातील विविध भागात कामानिमित्त आलेल्या मतदारसंघ वासीयांचे आभार व्यक्त करण्यासाठी आ.सुरेश धस रविवार दि.१७ ऑगस्ट रोजी येणार आहेत. या आभार दौऱ्यासाठी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बंटी शेठ सगळे,बंडुसाहेब तोडकर,शहादेव चौधरी यांनी केले आहे.

मराठवाड्यातील आष्टी,पाटोदा, शिरूर मतदारसंघातील जनतेच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमदार सुरेश धस हे पुणे शहरातील चिंचवड



येथे येत आहेत.रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वा.आहेर गार्डन, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे येथे जनतेशी संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमात मतदारसंघातील विकासकामे आणि जनतेच्या अपेक्षांबाबत चर्चा होईल.स्नेह मेळावा घेऊन आभार मानणार आहेत.

आ. सुरेश धस यांनी नेहमीच जनतेच्या हिताला प्राधान्य दिले असून, त्यांच्या या भेटीमुळे पुण्यातील मराठवाड्याच्या जनतेशी त्यांचा संवाद अधिक दृढ होईल अशी अपेक्षा आहे.पुणे शहरात रहिवाशी असलेल्या सर्व जनतेने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन बंडुसाहेब तोडकर,शहादेवचौधरी, कुमार कोकणे,गणेश कदम ,वलवळे राजेंद्र, अनिल टेकाळे,बंटी सगळे, इंद्रजित पवार यांच्यासह पुणे शहरातील प्रमुखांच्यावतीने करण्यात येत आहे.

# महाराणी ताराबाई विद्यालय व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन पावसात मोठ्या उत्साहात साजरा

## एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र झाल्याबद्दल सुमित थोरात व अनिकेत शिंदे यांचा स्वातंत्र्यदिनी मा.आ.केशवराव आंधळे यांच्या हस्ते सत्कार

**वडवणी - प्रतिनिधी**

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालयाच्या प्रारंगणामध्ये ध्वजारोहण सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

आरएसपी व स्काऊट गाईडच्या पथकाने मान्यवरांना मानवंदना दिल्यानंतर ध्वजारोहण सोहळ्याच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक, सचिव तथा चौसाळा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

राष्ट्रगीत व राज्य गीताचे गायन झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.अनिलदादा चोले, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मधुकररावजी धस, वडवणी कृ.उ.बा.स.संचालक पांडुरंग बापू अंडील,वडवणी कृ.उ.बा.स.संचालक रणजीत भैय्या धस,पशुवैद्यकीय डॉ.नेहरकर तसेच विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे / डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के



सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. स्वागत गीत गाऊन विद्यार्थिनीने मान्यवरांचे व उपस्थितीतांचे स्वागत केले.

महाराणी ताराबाई विद्यालयाचे माजी विद्यार्थी चि.सुमित थोरात यांचा एम्स मेडिकल कॉलेज रायपूर तर चि.अनिकेत शिंदे यांचा बीजे मेडिकल कॉलेज पुणे या ठिकाणी एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र झाल्याबद्दल माजी आमदार केशवराव आंधळे व विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे- डोईफोडे मॅडम यांनी पुष्पगुच्छ देऊन पालकासह सत्कार करण्यात आला तसेच महाराणी ताराबाई विद्यालयाचे व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलच्या सुसज्ज डिजिटल कार्यालयाचे फीत कट करून माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले देशभक्ती गीत गायन,देशभक्ती गीतावर नृत्य,महापुरुषांच्या वेशभूषा,देशभक्ती गीतावर कवायती विद्यार्थ्यांनी सादर करून १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन भरपावसात मोठ्या उत्साहात साजरा केला.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अंडील जी.पी.व सौ.प्रियांका कुरकुटे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील व इंग्लिश स्कूल मधील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# काळमवाडीत उपसरपंच स्वप्निल सूर्यवंशी यांनी केले ध्वजवंदन

**शिराळा / प्रतिनिधी**

काळमवाडी तालुका वाळवा येथील ग्रामपंचायतच्या वतीने सार्वजनिक झेंडावंदन उपसरपंच स्वप्निल सूर्यवंशी यांच्या हस्ते संपन्न झाले.

येथील जिल्हा परिषद शाळेत शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तानाजी सावंत यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.

यावेळी सरपंच सौ.सविता सावंत, पोलीस पाटील सौ. संगीता वारे, ग्रामपंचायत सदस्य नामदेव सावंत, बापूसाहेब देसाई, उमेश सावंत, आनंदा जाधव, हौसाबाई सावंत, रेश्मा बंडगर, पद्मा परकारे, निलम सावंत, शितल सावंत, ग्रामसेवक राजू देवकर, प्रकाश सावंत, शिवाजी सावंत, वसंत सावंत, संभाजी सावंत, सोसायटीचे संचालक अजित सावंत, नंदकुमार सुपनेकर, डॉ. विकास पाटील, बाजीराव सावंत फौजी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बजरंग सावंत, मुख्याध्यापिका सुनीता कदम, जागर शिक्षणाचा प्रणेते दीपक रोकडे, सुनील हवालदार, राहुल मोरे, सचिन बामणे, सुहास पाटील,संगीता सुपने, मनीषा काटवटे,आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने इयत्ता पाचवी, आठवी शिष्यवृत्ती परीक्षा, एन एम एम एस परीक्षा आणि इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शिल्ड आणि प्रशस्तीपत्र देऊन करण्यात आला. गावातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींचाही सत्कार यावेळी करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर आधारित कवायत सादर करून सर्वांची मने जिंकली. ग्रामपंचायतच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.



# गोकुळची छाया, वृंदावनाचा गंध, देऊळगावातील अलौकिक गोपालकाला

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

गोकुळाष्टमीच्या पवित्र दिवशी देऊळगावातील बालगोपालांनी राधा-कृष्णाच्या वेशभूषेत सादर केलेला गोपालकाळा हा केवळ एक उत्सव नव्हता, तर श्रद्धा, संस्कृती आणि एकात्मतेचा तेजस्वी दीप ठरला. लहानग्यांच्या निरागस रूपातून साकारलेली कृष्णलीला पाहून ग्रामस्थांच्या मनात भक्तिभावासोबतच अभिमानाची जाणीवही दाटून आली.

डोक्यावर मोरपिसांचा मुकुट, गळ्यात मुरली, आणि अंगावर रेशमी वस्त्रांची झळाळी—असा गोजिरवाणा कान्हा जणू भक्तीचा संदेश घेऊन अवतरला होता. तर बालराधेच्या लाजऱ्या हास्यातून आणि माधुर्यपूर्ण लीलांमधून संस्कृतीची दिव्य छटा उमटत होती. या लहानग्यांच्या रूपातून नव्या पिढीला आपल्या परंपरेशी जोडून ठेवण्याचा प्रेरणादायी ध्यासच प्रकट होत होता.

हे बालगोपाल राजमाता आश्रम शाळा चे प्राचार्य श्रीयुत शिवाजीराव दानवे सर यांचे नातू आहेत. कृष्णाच्या रूपात यशराज नवनाथ दानवे यांनी वेशभूषा साकारली. आणि राधेच्या भूमिकेत कृष्णाली वैभव दानवे हिने वेशभूषा साकारली.

देऊळगाव घाट मध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला मंदिराच्या प्रांगणातील फुलांची आरास, दीपांची झगमगाट, आणि टाळ-मृदंगांचा गजर यामुळे गोपालकाळा अधिकच मंगलमय झाला. “जय जय नंदलाल”च्या दुमदुमत्या घोषणांनी केवळ कान तृप्त झाले नाहीत, तर मनात संस्कारांचे बीज रोवले गेले.

महिला मंडळांच्या भजनांनी आणि युवकांच्या उत्साही सहभागाने या सोहळ्याला अधिकच अर्थपूर्ण रूप प्राप्त झाले. देऊळगावातील हा गोपालकाळा केवळ एका दिवसाचा सण नसून, गावकऱ्यांना एकत्र आणणारा, संस्कृतीची जाण देणारा आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा ठरला.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार, 17 ऑगस्ट 2025




# लातूर एमआयटी येथे उत्साहात स्वातंत्र्य दिनानिम्मित आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण



**लातूर**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने माईर्स एमआयटी वैद्यकीय शैक्षणीक संकुल, लातूर येथे शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मोठ्या उत्साहाच्या आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या हस्ते धन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सभासद कर्मचाऱ्यांच्या नव्वद टक्केहून अधिक गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत पाल्यांचा विविध पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आले. त्याचबरोबर रुग्णालय कक्षात उत्कृष्ट काम केल्याबद्दल परिचारिका श्रीमती आशा सोनवळे, मीरा बजगुडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच उत्कृष्ट कर्मचारी अध्यापक डॉ भागवत शेळके, ग्रंथपाल चाफेकर यांचाही यथोचित सत्कार करून गौरव करण्यात आला.

याप्रसंगी नर्सींग महाविद्यालयाचे प्राचार्य सरवननसेना, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यतीश जोशी, उपप्राचार्य डॉ अमोल डोईफोडे, रूग्णालय अधीक्षक डॉ. एकनाथ माले, डॉ. अरुणकुमार राव, डॉ. विद्या कांदे, डॉ. चंद्रकला पाटील, डॉ. पठाण, डॉ. बी. एस. वारद, डॉ. मुकुंद भिसे, डॉ. कस्तुरे, डॉ चंद्रकांत चाटे, डॉ. पठाण, डॉ तोष्णीवाल, डॉ. शैला बांगड, डॉ. आशा पिचारे, डॉ. क्रांती केंद्रे, डॉ. क्रांती पाटील, डॉ. कुलकर्णी मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, श्रीपती मुंडे यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय, फिजीओथेरपी महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक व नागरीक ध्वजारोहण कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी मिरवणूक संपन्न




**आष्टी प्रतिनिधी**

आष्टी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशतोकोतर सुवर्ण महोत्सवी.. ७२५ व्या जयंती निमित्त माऊलींची पालखी मिरवणूक आणि वारकरी सांप्रदायिक दिंडीचे आयोजन करण्यात आले होते..

या शोभायात्रा आणि दिंडीमुळे आष्टी शहर भक्तिमय झाल्याचे दिसून येत होते.या शोभायात्रेत आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस व नगरपंचायत चे मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार बाळ दत्त मोरे यांनी सहभाग झाले होते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून.. कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७२५ व्या सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त राज्यभरातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां,नगरपंचायत, नगरपरिषद, या ठिकाणी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीची मिरवणूक आणि वारकरी संप्रदायाच्या जयघोषात दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर आष्टी नगरपंचायत कार्यक्षेत्रामध्ये भाविकांच्या उत्साहात आणि भक्तिभावाने माऊलींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत टाळकरी, वारकरी संप्रदायातील मंडळी तसेच नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून "ज्ञानोबा माऊली" आणि "माऊली माऊली"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला.. यावेळी हरिभक्त परायण अशोक भोसले महाराज यांच्या श्री संत नामदेव महाराज गुरुकुल पारगाव जोगेश्वरी येथील 35 विद्यार्थ्यांनी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभाग नोंदवला आष्टी शहरातील श्री दत्त मंदिर येथून या पालखी सोहळ्यातील सुरुवात करण्यात आली आणि ही शोभायात्रा दत्त मंदिर गल्ली कसबा पेठ कुंभार गल्ली जैन मंदिर कमान वेस मार्गे मुख्य बाजारपेठ शनी मंदिर चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये या शोभा यात्रेची सांगता झाली.

या पवित्र सोहळ्यात सहभागी होऊन माऊलींचे दर्शन घेत अनेक भाविक भक्तांनी आत्मिक आनंदाचा अनुभव घेतल्याचे पहायला मिळाले, असे प्रतिपादन आ.सुरेश धस यावेळी वारकऱ्यांशी संवाद साधताना केले. या शोभायात्रेत आष्टी नगरपंचायतचे अधिकारी, कर्मचारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आनंद शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा; डॉ. अजय धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

## राष्ट्रभक्ती व शेतकरी गीतांना संस्थाध्यक्ष धोंडे यांच्याकडून भलाभरुन दाद

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी येथील आनंद शैक्षणिक संकुलातील कृषी महाविद्यालयात ७९ वा. स्वातंत्र्यदिन राष्ट्रभक्तिपूर्वक आणि उत्साहात साजरा करण्यात आला.आनंद चॅरिटेबल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.संस्थेचे सहसचिव डॉ. अजयदादा धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



कार्यक्रमास प्रा.राजेंद्र धोंडे, अभयराजे धोंडे,ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,प्रशासन अधिकारी डॉ.डी.बी.राऊत,प्रा. शिवदास विधाते,संजय शेंडे, प्रा.सागर वाघुले,संदीप ननवरे, शिवाजी थोरवे,सुभाष वाघ, आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, पोलीस कॉन्स्टेबल रमेश गिरी व विद्यार्थी उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर व शेताकरी गीतांनी उपस्थितांची मने जिंकली.१२ गीतांची सादरीकरणे करण्यात आली. कृषी महाविद्यालयाच्या शेतकरी गीतासाठी उपस्थितांनी भरभरून असा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भीमराव धोंडे यांनी शेतकरी गीतामध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना १० हजार रु बक्षीस दिले. संस्थेच्यावतीने स्पर्धक विद्यार्थ्यांना रोख रक्कम स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. बक्षीस वितरण स्वरूप,प्रथम क्रमांक: ५००१ रु, द्वितीय क्रमांक: ३००१ रु,तृतीय क्रमांक: २००१ रु डिप्लोमा विभाग -प्रथम क्रमांक

डी. फार्मसी महाविद्यालय, द्वितीय क्रमांक: नर्सिंग महाविद्यालय , तृतीय क्रमांक: डिप्लोमा इंजिनिअरिंग विद्यालय. डिग्री विभाग: प्रथम क्रमांक: श्री छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय, द्वितीय व तृतीय क्रमांक: बी. फार्मसी महाविद्यालय. तंत्रनिकेतनचे प्राचार्य संजयबोडखे यांनी कु. ऋतुजा पांडुरंग कवाळे हिला उत्कृष्ट देशभक्तीपर गीत ओ देश मेरे गायनाबद्दल १ हजार रुपये बक्षीस दिले.डॉ.अजयदादा धोंडे यांनी आपल्या मनोगतात सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विशेष कौतुक केले. आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयांची उत्तरोत्तर प्रगती होत आहे.

अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढतो असे मत व्यक्त केले.त्यांनी सर्व महाविद्यालयांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि संस्थेच्या वतीने अशाच उपक्रमांचे आयोजन पुढेही करण्यात येईल असे सांगितले. ध्वजारोहण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एल.एस. मिसाळ तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कु.एस.एल.बनकर यांनी केले.आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. एस.आर.आरसुळ यांनी केले.कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब खेमगर,डॉ. राजाभाऊ ढोबळे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.एस.पवार यांनी काम केले. एकात्मतेचे आणि देशप्रेमाचे दर्शन घडवणारा हा सोहळा संस्मरणीय ठरला.

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित हर घर अभियानांतर्गत विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण

**परळी वैजनाथ - (प्रतिनिधी)**

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख यांच्या हस्ते तिरंगा ध्वजास वंदन करून बक्षीस वितरण करण्यात आले.

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियानांतर्गत महाविद्यालयाच्या प्रांगणात तीन दिवस ध्वज वंदन करण्यात आले. बुधवारी (ता.१३) संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसादजी देशमुख यांच्या हस्ते ध्वजवंदन, गुरुवारी (ता.१४) संस्थेचे सचिव रवींद्रजी देशमुख यांच्या हस्ते ध्वजवंदन तर शुक्रवारी (ता.१५) स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित मुख्य समारंभात संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख यांच्या हस्ते ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा, वर्ग सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण व विविध भित्तीपत्रकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना स्मृती चिन्ह व पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले. तसेच प्रा डॉ विद्या गुळभिले यांना पेटंट मिळाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख, सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसादजी देशमुख, संचालक श्री कांबळे, संचालिका छायाताई देशमुख, प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा अरुण चव्हाण यांनी केले.

